प्रेस नोट दि. १४/१०/२०२०

**५००००/—रूपये लाचेची मागणी केल्याप्रकरणी चाकुर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक बालाजी मारोती तोटेवाड यांचेवर पोलीस स्टेशन चाकुर येथे गुन्हा दाखल.**

यातील मुळ तक्रारदार यांचे वडील व भावाचे पत्नीस मारहाण केल्याप्रकरणी भावाचे पत्नीने पोलीस स्टेशन चाकुर येथे दिलेल्या तक्रारी अर्जावरून दाखल असलेल्या गुन्हयात आरोपीवर कारवाई करण्यासाठी व त्याच प्रकरणात तक्रारदार यांचे वडील व भावाचे पत्नी विरूध्द गैरअर्जदार यांनी पोलीस स्टेशन चाकुर येथे दिलेल्या तक्रारी अर्जात मदत करण्यासाठी चाकुर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक बालाजी मारोती तोटेवाड यांनी ४०,०००/—रूपये मागणी केली आहे अशा आशयाची तक्रार लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, लातुर यांचेकडे दिनांक १३/१०/२०२० रोजी प्राप्त झाली होती.

तक्रदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलचुपत प्रतिबधंक विभाग, लातुर कार्यालयाकडुन दिनांक १३/१०/२०२० रोजी पंचासमक्ष पोलीस स्टेशन चाकुर येथे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता सहायक पोलीस निरीक्षक बालाजी मारोती तोटेवाड पोलीस स्टेशन चाकुर यांनी तक्रारदार यांचे भावाचे पत्नीने दिलेल्या तक्रारी अर्जावरून दाखल असलेल्या गुन्हयात आरोपीवर कारवाई करतो म्हणुन व तक्रारदार यांच्या घरच्यांच्या विरोधात दाखल असलेल्या तक्रारी अर्जात मदत करतो म्हणुन तक्रारदाराकडे १,००,०००/—रूपये लाचेची मागणी करून त्यात तडजोडीअंती ५०,०००/—रूपये लाच घेण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. परंतु सहायक पोलीस निरीक्षक बालाजी मारोती तोटेवाड यांना संशय आल्याने लाचेची रक्कम घेण्याचे जाणुनबूजुन टाळले आहे.

सहायक पोलीस निरीक्षक बालाजी मारोती तोटेवाड पोलीस स्टेशन चाकुर यांचे विरूध्द पोलीस स्टेशन चाकुर येथे गुन्हा रजि. नंबर ३७३/२०२० कलम ७ ला.प्र.का. १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक कुमार दराडे लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, लातुर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्रीमती कल्पना बारवकर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परीक्षेत्र, नांदेड व अपर पोलीस अधिक्षक श्रीमती अर्चना पाटील लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परीक्षेत्र, नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री. माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक श्री, कुमार दराडे, श्री. बाबासाहेब काकडे, पोहेकॉ संजय पस्तापुरे, लक्ष्मीकांत देशमुख, पोना चंद्रकांत डांगे, मोहन सुरवसे, मपोना शिवकांता शेळके, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, अमोल शिंदे, आशिष क्षिरसागर, संदिप जाधव, दिपक कलवले, मपोशी रूपाली भोसले व चालक पोना राजु महाजन यांनी परिश्रम घेतले.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे संदर्भात मोबाईल फोनवर शासकीय अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ किंवा ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | |
|---|---|
| १. श्रीमती कल्पना बारवकर :<br>पोलीस अधिक्षक लाप्रवि, नांदेड परीक्षेत्र, नांदेड | मोबाईल क्रमांक : ८८८८८४१९६५ |
| २. श्री. माणीक बेद्रे पोलीस उप अधिक्षक, लातुर | मोबाईल क्रमांक : ९९२३६६६६४४ |
| ३. श्री. कुमार दराडे, पोलीस निरीक्षक, लातुर | मोबाईल क्रमांक: ९६५७७०९८४१ |
| ४. श्री. बाबासाहेब काकडे, पोलीस निरीक्षक, लातुर | मोबाईल क्रमांक ९०६७२६६२६४ |
| ५. टोल फ्रि हेल्प लाईन क्रमांक | १०६४ |
| ६. कार्यालयाचा फोन क्रमांक | ०२३८२–२४२६७४ |
| ७. Website | www.acbmaharashtra.gov.in |
| ८. Mobile app | www.acbmaharashtra.net |
| ९. Facebook page | www.facebook.com/maharashtraACB |

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर